# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सांगली

१५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार एचडब्ल्यूसी ग्रामीण व शहरी भागाकरिता मंजूर स्टाफ नर्स नमूद शैक्षणिक अर्हतेनुसार व प्रवर्गनिहाय तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपात भरणेकरिता विहित अटी व शर्तीनुसार अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | वय | एकूण पद संख्या | प्रवर्ग | प्रतिमहा एकत्रित मानधन | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स (GNM) | GNM/B. Sc Nursing (महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक) | राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे / खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे | ३३ | अ.जा. - ४<br>अ.ज.- २<br>वि.जा.अ. - १<br>भ.ज.ब.-१<br>भ.ज.क.-१<br>भ.ज.ड.-१<br>वि.मा.प्र.-१<br>इ.मा.व. - ६<br>ईडब्ल्युएस - ३<br>खुला - १३ | २०००० | महानगरपालिका - १५<br>इस्लामपूर - ३<br>आष्टा - २<br>जत - २<br>पलूस - २<br>विटा - ४<br>तासगाव - २<br>शिराळा - १<br>क. महांकाळ - १<br>कडेगाव - १ |

**अटी व शर्ती**

१) सदरची पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणासंबंधी दावा करणेचे अधिकार राहणार नाहीत. २) आवश्यक पात्रता असलेले उमेदवार न मिळाल्यास, त्या पदांकरीता असलेली पात्रता, अनुभव व अर्हता शिथिल करणेचे अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत. ३) पदांसाठी नमुद मानधन हे एकत्रित मासिक मानधन आहे. ४) अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. ५) नियुक्त उमेदवाराकडून नियुक्ती कालावधीमध्ये बेशिस्त वर्तन, कामात कुचराई झालेस संबंधितांना कार्यमुक्त करणेचे अधिकार निवड प्राधीकरणाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत. ६) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. ७) शासकीय, निमशासकीय, शासन अंगीकृत संस्था तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवास प्राधान्य असेल. ८) नियम व अटींच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देणेत येतील. उमेदवारांची नियुक्ती ही गुणांकनानुसार करणेत येईल. उच्च शैक्षणिक अर्हताधारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. ९) नियुक्त उमेदवाराकडून नियुक्ती कालावधीमध्ये बेशिस्त वर्तन, कामात कुचराई झालेस संबंधितांना कार्यमुक्त करणेचे अधिकार निवड प्राधीकरणाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत. १०) विहीत नमुन्यात अर्ज साक्षांकित प्रतीसह जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, प.व.पा.शा. रुग्णालय आवार, ब्लॉक नं. ७७, सांगली येथे दि०४/१०/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सुट्टी व्यतिरिक्त कार्यालयीन वेळेत सादर करावेत. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. ११) अर्जदाराने ए-४ आकाराच्या कोऱ्या कागदावर अर्ज करावयाचा असून त्यामध्ये खालील बाबी अंतर्भूत असाव्यात. सोबत अर्जाचा नमूना प्रसिध्द केला आहे.

**अ) उमेदवाराची सर्वसाधारण माहिती :-** १) अर्ज केलेल्या पदाचे नाव २) ठळक अक्षरात स्वत:चे संपूर्ण नाव ३) अर्जदाराचा पत्ता, दूरध्वनी व मोबाईल क्रमांक ४) ईमेल आयडी ५) जन्मतारीख ६) शैक्षणिक अर्हतेचा संपूर्ण तपशील- अभ्यासक्रमाचे नाव उत्तीर्ण झालेचे वर्ष गुणांचा तपशील व टक्केवारी ७) कामाचा अनुभव - काम केलेली संस्था, एकूण कालावधी, संबंधित संस्थेत कोणत्या पदावर काम केलेले आहे.

**ब) आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती :-** १) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र २) पदानुसार संबंधित काऊन्सिलकडे रजिस्ट्रेशन केलेले नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ३) शाळा सोडल्याचा दाखला / जन्म तारखेचा दाखला ४) अनुभवाचे प्रमाणपत्र ५) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.

१२) अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्याच्या सोईनुसार ठिकाण बदलून मागता येणार नाही. १३) कोणतीही पूर्वसूचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत. १४) सर्व मागासवर्गीय अर्जदारांकरिता जातीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. ते नसलेस अशा उमेदवारांना राखीव प्रवर्गामधून लाभ घेता येणार नाही.

सही/-
सदस्य निवड समिती
तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली

सही/-
सदस्य निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

सही/-
सदस्य निवड समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

RojgarMarathi.com